## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष

## निशाणी क्र. ०६

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – ज्ञानेश्वर मिठाराम पाटील,

वय – ३९ वर्षे,

व्यवसाय – शेती,

राहणार – रहिमपुरा, ता. शिंदखेडा, जि. धुळे,

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सरकारी विधीज्ञ श्री. सी. बी. चव्हाण यांचे मार्फत.**

०१. दि. ०६.०६.२०१८ रोजी माझा भाऊ यशवंत मिठाराम पाटील आणि जगन विक्रम पाटील यांचा अपघात झाला होता. त्यादिवशी ते बियाणे घेवुन दोंडाईचाकडून रहिमपुराकडे घरी जात होते. त्यांचा अपघात दोंडाईचा ते सोनगीर रस्त्यावर संतोष पेट्रोल पंपांच्यासमोर झाला होता. त्यांना प्रमोद लोटन पाटील याच्या ४०७ गाडी नं. एम.एच.–१८–एम.–३५४९ हिने धडक दिली होती. अपघातामध्ये माझ्या भावाला डोक्याला दुखापत झाली होती तसेच जगन विक्रम पाटील याला गंभीर दुखापत झाली होती. सदर बाब मला विखरण येथील कुणाल धोंडु पाटील यांनी फोन करुन सांगितली होती.

०२. फोन आल्यानंतर मी घरुन अपघातस्थळी गेलो होतो. अपघाताच्यास्थळी भावाची मोटारसायकल होती. तिथे ४०७ गाडी नव्हती. भावाला दोंडाईचा येथील रुग्णालयात आणले होते. अपघातस्थळावरुन मी दोंडाईचा रुगणालयात आलो होतो. रुग्णालयात मला समजले की भावाचा मृत्यु झाला आहे. तसेच जगन विक्रम पाटील यांस धुळयाल रुगणालयात घेवुन गेल्याचे मला समजले. त्याचदिवशी मी दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली होती. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील फिर्याद दाखविण्यात आली.) आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद ही तीच आहे. सदर फिर्यादीवर माझी सही आहे. सदर फिर्यादीतील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर फिर्यादीस **नि. क्र. ०७** देण्यात येते.) मी

प्रमोद लोटन पाटील याला पाहिल्यास ओळखु शकेन. तो आज रोजी न्यायालयासमक्ष हजर नाही. (आरोपीच्या गैरहजेरी माफीचा अर्ज नि. क्र. ०४ कडे व पुरसीस नि. क्र. ०५ कडे दाखल आहे. )

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. पी. जी. पाटील यांचे मार्फत.</u>**

०३. हे म्हणणे खरे आहे की, घटना घडली त्यावेळेस मी रहिमपुरा येथे माझ्या शेतावर होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनेनंतर मी साधारण २० ते २५ मिनिटांनी घटनास्थळी पोहोचलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावर मी ४०७ गाडी व प्रमोद लोटन पाटील यांस पाहिले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेबाबत मला समजल्यावर मी घटनास्थळी गेलो व तेथुन रुग्णालयात गेलो व पी. एम. करीता थांबलो याच्याव्यतिरिक्त मला घटनेबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रमोद लोटन पाटील याचे नाव ४०७ गाडीचा नंबर हा इतरांकडून मला समजल्याप्रमाणे मी फिर्यादीमध्ये नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, भावाच्या मृत्युबाबत नुकसान भरपाई मिळावी याकरीता आम्ही धुळे येथील न्यायालयामध्ये केस दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, धुळे येथील न्यायालयामध्ये नुकसान भरपाई मिळण्याकरीता फिर्याद दाखल करावी लागेल असा सल्ला मला मिळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, नुकसान भरपाई मिळण्याकरीता मी प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

०४. हे म्हणणे खरे नाही की, माझा भाऊ यशवंत मिठाराम व जगन विक्रम यांना मोटारसायकल व्यवस्थित चालविता येत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाकडे वाहन चालविण्याचा परवाना नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दुसऱ्याची मोटारसायकल घेवुन माझा भाऊ गेला होता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या भावाला अधुनमधुन दारु पिण्याची सवय होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतची फिर्याद दाखल केल्यानंतर व धुळे येथे नुकसान भरपाई प्रकरण दाखल केल्यानंतर माझा प्रमोद लोटन पाटील यांस भेटण्याचा योग आला.

०५. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०६.०६.२०१८ रोजी माझा भाऊ यशवंत व जगन हे मोटारसायकलवरुन जात असतांना दोंडाईचा ते सोनगीर रस्त्यावर संतोष पेट्रोल पंपासमोर प्रमोद लोटन याच्या ४०७ गाडीने त्यांना धडक दिली व त्यामुळे माझ्या भावाच्या डोक्यास दुखापत झाली व जगन विक्रम यांस गंभीर दुखापत झाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या अपघातामुळे माझा भाऊ मृत्यु पावला हे देखील मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, नि. क्र. ०७ कडील फिर्यादमध्ये मजकुर पोलीसांनी लिहुन ठेवला होता व मी त्याच्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटे साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2024.10.07 11:12:35 +0530

दिनांक : ०५/१०/२०२४
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – गणेश साईनाथ अहिरे, लघुलेखक (श्रेणी–३) |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ०७.१०.२०२४ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.